# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email :jdtepu@pn3.vsnl.net.in

जा क्र : तंशिविकापु/विवि/२००९/६१२४ दिनांक : २०/०६/२००९

21 JUN 2009

प्रति,

मा. अध्यक्ष / संचालक / प्राचार्य

पुणे विभागातील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एम बी ए / एम एम एस व एम सी ए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : रिट याचिका क्र २२-१६/२००६ अन्वये राज्यातील व्यवसाय अभ्यासक्रम चालविणा-या संस्थामध्ये प्राचार्य/ संचालक पद भरण्याबाबत केलेली कार्यवाही .
माहिती सादर करण्याबाबत

संदर्भ : १) मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म रा मुंबई यांचे पत्र क्र २/एनजीपी/न्याप्र/२००८/ दिनांक ९/०६/२००९.
२) मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म रा मुंबई यांचे पत्र क्र २/एनजीसी/न्याप्र/२००९/४०३ दिनांक १८/०६/२००९.
३) या कार्यालयाचे पत्र क्र विकापु/विवि/प्राचार्य/माहिती/२००९-१०/५७०५ दिनांक १६/०६/२००९
४) या कार्यालयाचे पत्र क्र विकापु/विवि/बैठक/२००९/५८९९ दिनांक १९/०६/२००९
५) मा संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म रा मुंबई यांचे पत्र क्र २ /एनजीसी/न्याप्र/२००९/४१० दिनांक १९/०६/२००९.

उपरोक्त विषयास अनुसरुन संस्थांकडून माहिती मागविण्यात आली होती. तथापी संस्थांकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे संदर्भ पत्र क्र ४ अन्वये या कार्यालयामार्फत दिनांक २०/०६/२००९ रोजी संस्थाप्रमुखांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीसदेखील संस्था प्रमुखांची आवश्यक अशी उपस्थिती नव्हती, त्यामुळे अद्यापी काही संस्था कडून माहिती प्राप्त झालेली नाही. ही बाब गंभीर आहे.

संबंधीत संस्थांना पुन्हा कळविण्यात येते की, संदर्भ पत्र क्र ४ मधील माहिती या कार्यालयास दिनांक २२/०६/२००९ सोमवार रोजी पर्यत हस्तदेय पाठवावी. सदर्भ पत्र क्र ४ चे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर माहिती या कार्यालयास विहीत मुदती मध्ये प्राप्त न झाल्यास होणा-या परिणामाची जबाबदारी संबधीत संस्थेचीच राहील याची नोंद घ्यावी.

सदर्भ पत्र क्र ५ ची छायाप्रत या पत्रासोबत जोडलेली आहे. संबधीत संस्थांनी सदर पत्राची नोद घेणे आवश्यक आहे.

सोबत : वरील प्रमाणे

गो.पं.चौधरी

(गो. पं. चौधरी)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : १) मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म रा मुंबई यांना माहितीसाठी
२) श्री शिंदे प्राग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.in Website: http://www.dte.org.in

अत्यंत महत्वाचे

क्रमांकः २/एनजीसी/न्याप्र./२००९/ ८५०
दिनांकः- १९ जून २००९

प्रति,

विषयः- रिट याचिका क्र.२२१६/२००६ अन्वये राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांमध्ये प्राचार्य / संचालकांचे पद न भरल्यामुळे प्रथम वर्ष प्रवेश न करण्याबाबत.

मा.उच्च न्यायालयाच्या विषयांकित याचिकेवरील निर्देशानुसार दिनांक ३१/५/२००९ पूर्वी प्राचार्य / संचालकांचे पद आपल्या संस्थेत भरणे आवश्यक होते व त्याप्रमाणे या संचालनालयाने विभागीय सहसंचालकांमार्फत सूचना दिलेल्या होत्या. उपरोक्त निर्देशानुसार आपल्या संस्थेत प्राचार्य / संचालकांचे पद भरलेले नसल्यामुळे आपल्या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २००९-१० करिता प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यात येऊ नये. सदर प्रवेश केल्यास विद्यापीठांमार्फत विद्यार्थ्यांना एनरॉलमेंट देण्यांत येणार नाही व त्यानंतर होणाऱ्या परिणामास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई